**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीपाल लक्ष्मण मगदूम ..... **अपीलकर्ता**
मु.पो.वड्डी , ता.मिरज,
जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, ..... **उत्तरवादी**
पंचायत समिती मिरज,
जिल्हा सांगली

**जा माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत वड्डी,
ता.मिरज, जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८९/२००९/ सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | २९/०८/२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | १०/११/२००९ |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** मौजे वड्डी ग्रामपंचायत येथील निर्मलगाव योजना, ग्रामस्वच्छता अभियान, रोजगार हमी योजनेअंतर्गत विकास कामांची माहिती सन २००५ ते २००९ या कालावधीत योजनांतर्गत खर्चाचा तपशील. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.श्रीपाल लक्ष्मण मगदुम यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर )

जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १६-१२-२००९.**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती सुमन धैर्यशील शेळके — अपीलकर्ता
मु.पो.लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, ता.खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्रीमती सुमन धैर्यशील शेळके, मु.पो.लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा, श्री. जी. एस. सांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, ता.खंडाळा, जि. सातारा, श्री. बी. ए. खुंटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

पिकपाहणी पंचनामा खोटा केला असून दोन पंचासमक्ष गाव कामगार तलाठी व मंडल अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत आपल्याला मिळावी. आपण अर्ज केला तेव्हा निवडणूक प्रक्रिया चालू असल्यामुळे नंतर माहिती देण्यात येईल, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा यांनी सांगितले. परंतु त्याप्रमाणे माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती सुमन धैयशील शेळके यांच्या वतीने श्री. सत्वशील धैयशील शेळके यांनी केले.

श्री. सत्वशील धैयशील शेळके याच अनुषंगाने सातत्याने विविध पातळ्यांवर अर्ज व अपिले करीत आले आहेत. वारंवार त्यांना माहिती देण्यात आली आहे. दोन फेरफाराबाबत आरटीएस कागदपत्रांचा आढळ होत नसल्याचे श्री. शेळके यांना त्या त्या वेळी कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा श्री. बी. ए. खुंटे यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा श्री. बी.ए.खुंटे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा श्री. जी.एस.सांगडे यांनी अहवाल सादर केला नाही, ही बाब गंभीर आहे. आयोगाने स्मरण दिल्यानंतर विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा यांनी दि. २५.९.२००९ च्या पत्रान्वये अहवाल सादर केला.

याच अनुषंगाने श्री. शेळके यांनी केलेल्या अन्य अपिलात उप विभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई यांनी गावकामगार तलाठी, लोणंद श्री. के.पी. शेंडे यांना सक्त ताकीद देऊन सेवा-पुस्तकात नोंद घेण्याची शिक्षा दिली होती. तथापि अपील क्र.७२/सातारा मध्ये राज्य माहिती आयोगाने दिलेल्या आदेशानुसार ही शिक्षा रद्द करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम, १९७९-मधील तरतुदींनुसार श्री. शेंडे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली असून त्यांची एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न करता रोखून ठेवण्यात आली आहे, व त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात

घेण्यात आली आहे. तसेच दि. २३.९.२००९ रोजीच्या पत्रान्वये ऊर्वरित माहिती घेऊन जाण्याबाबत श्री. शेळके यांना कळविले आहे, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा यांनी दि. २५.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा श्री. बी. ए. खुंटे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा श्री. जी. एस. सांगडे यांनी विहित मुदतीत अहवाल सादर न करण्याबाबत कडक ताकीद देण्यात येत असून त्याची नोंद त्यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी. जिल्हाधिकारी, सातारा यांनी याबाबत पूर्तता करुन पंधरा दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. प्रदिप सिताराम कदम व अन्य चार
मु. पो. येरफळे, ता. पाटण, **अपीलकर्ता**
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी, **उत्तरवादी**
पंचायत समिती पाटण, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत येरफळे, ता. पाटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९१ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.४.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.४.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.७.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.११.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. प्रदिप सितारास कदम व अन्य चार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रु. २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपती चंद्रू कांबळे
मु. खेडे, पो.सोंडोली, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
शाहूवाडी, ता. शाहूवाडी, जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
शाहूवाडी, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९०८/२००९/ कोल्हापूर** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>महार वतन व पोट हिश्यापोटी असणा-या जमिनीचा खुलासा होणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गणपती चंद्रू कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी माहिती अर्जान्वये केलेली मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.रमेश पांडुरंग जाधव
जुना समडोळी रोड, अमर महाराष्ट्र चौक,
मु.पो. सांगलीवाडी, ता.मिरज,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,
चिंतामणराव व्यापार महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी
चिंतामणराव व्यापार महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९११ व १९१२/२००९ / सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/१०/२००९ व २५/८/२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१/१०/२००९ व २७/१०/२००९ |
| ४ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६/११/२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणीच्या मूळ अर्जांच्या (जोडपत्र-अ) छायाप्रतीसोबत जोडल्या आहेत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रमेश पांडुरंग जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेली अपिले विहीत नमुन्यात नाहीत. तसेच अपिलांसोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेलीनसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या दोन्ही अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२१-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. धनंजय लक्ष्मण शिंदे **अपीलकर्ता**
कनिष्ठ सहायक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गट विकास अधिकारी, पंचायत समिती सातारा, जि.सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** उप अभियंता, लघु पाटबंधारे, उप विभाग सातारा, जिल्हा परिषद सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९१७/२००९ / सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०-१०-२००८ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२-११-२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ०३-१२-२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-१२-२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. धनंजय लक्ष्मण शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील अधिनियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत दाखल केलेले नाही, तसेच विलंबाबाबतचे कोणतेही समर्थनीय कारण त्यांच्या सविस्तर निवेदनात नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. २३-१२-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. जालिंदर गुलाबराव राक्षे
राक्षेवाडी, रांजणगांव सांडस, ता.शिरुर,जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या.शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** शाखा अभियंता,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या.शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.०६.२००९ |
| ३. | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** - श्री. जालिंदर गुलाबराव राक्षे
राक्षेवाडी, रांजणगांव सांडस, ता.शिरुर,जि.पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या.शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे श्री.गुणवंत वैजनाथ पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.०२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ८ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पाठपुरावा करुनही आपल्याला वीज जोडणी न देता अधिकारी पैशाची मागणी करतात. शेतीचे नुकसान होऊ नये म्हणून आकडा टाकून वीज घेणे भाग पडले व दीड वर्षांनी आपल्याला

वीज मिळाली. दरम्यानच्या काळात झालेली शेतीची नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. जालिंदर गुलाबराव राक्षे यांनी केली.

विजेच्या चोरीप्रकरणी श्री.राक्षे यांना कळविलेले बिल त्यांनी भरलेले नाही. वीज-जोडणीसाठी येणारा खर्च कळवूनही त्यांनी भरला नाही, तरीही वीज जोडणी दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्या., शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे श्री.गुणवंत वैजनाथ पाटील यांनी केले.

संबंधित कागदपत्रांच्या प्रती व कार्यवाहीची तपशीलवार माहिती देणारे पत्र जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,म.रा.वि.वि.कंपनी मर्या.शिरुर,ता.शिरुर,जि.पुणे श्री.गुणवंत वैजनाथ पाटील यांनी अपीलकर्त्यास द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२२.०६.२००९ रोजी श्री.राक्षे यांना माहिती पुरविण्यात आली, असा अहवाल आयोगाने स्मरण दिल्यानंतर सहाय्यक अभियंता,म.रा.वि.वि.कं.मर्या.,शिरुर उपविभाग, शिरुर यांनी दि.२०.११.२००९ च्या पत्रान्वये सादर केला. विहित मुदतीत अहवाल सादर करण्याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे श्री.गुणवंत वैजनाथ पाटील यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २३ /१२/२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.कोंडींबा रामा जाधव
मु. पो. मानेगाव (धाकटे),
ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
सहायक व्यवस्थापक (क - सांगली),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
मंडल कार्यालय विश्रामबाग, सांगली.

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२० /२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.७.२००९ |
| ३ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- रोजंदारी कामगार म्हणून कार्यरत असताना एकुण २९५ दिवसांची उपदान (ग्रॅच्युईटी) मिळावी. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. कोंडींबा रामा जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच त्यांच्या मूळ मागणीबाबत त्यांना कळविण्यात आल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १८.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.राजन बळवंत भोकरे
बाराईमान दर्गा चौक, मिरज,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२२ /२००९/ सांगली |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** अपीलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने आवश्यक असलेल्या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.राजन बळवंत भोकरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

डॉ.रवींद्र दिगंबर चौधरी
५-अ,स.नं.१२३/१, बाणेर-म्हाळुंगे रोड,
बाणेर (प.), पुणे-४५ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
महाराष्ट्र वैद्यकिय परिषद, मुंबई-११

**जन माहिती अधिकारी तथा** प्रबंधक,
महाराष्ट्र वैद्यकिय परिषद, मुंबई-११ **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२८/२००९/पुणे |
| २ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती- वैद्यकिय प्रॅक्टिशनर्सच्या नोंदणीच्या अनुषंगाने माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, डॉ.रवींद्र दिगंबर चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. : २२-१२-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.अश्विनी अशोक दोरवट
बी /१०, बिनावत पार्क, ससाणेनगर, पुणे - ४११०२८ **अपीलकर्ता**

**विरूध्द**

१) **अपिलीय प्राधिकारी तथा**
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर **उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी**
डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३९ /२००९/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.६.६.२००९, ८.८.२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.८.२००९, ३१.८.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.९.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१०.२००९ |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती अश्विनी अशोक दोरवट यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती मागणी अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब श्री. दोरवट यांच्या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच एकाच मागणीसाठी वारंवार अर्ज व अपिले करणे योग्य नाही, याचीही नोंद अपीलकर्त्यांनी घेणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२ .१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उत्तमराव महादेवराव भोसले
मु.पिंपळवंडी, पो.साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी,
परिमंडल कार्यालय, 'ड ' विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ /२००९ /पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उत्तमराव महादेवराव भोसले
मु.पिंपळवंडी, पो.साखरवाडी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी,
परिमंडल कार्यालय 'ड ' विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.७.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.३.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.३.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१५.७.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१५.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एका व्यक्तीने घेतलेल्या एकाहून जास्त शिधापत्रिकांच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, परिमंडल कार्यालय 'ड ' विभाग, पुणे यांनी विहित मुदतीत दिली नाही, म्हणून त्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.उत्तमराव महादेवराव भोसले यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केली आहे.

श्री.भोसले यांनी अर्ज केला तेव्हा लोकसभा निवडणुकीचे कामकाज चालू होते. सर्व कर्मचारीवर्ग त्या कामी गुंतलेला होता, असे नमूद करून जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, परिमंडल कार्यालय 'ड' विभाग, पुणे श्रीमती आशा शंकर होळकर व अपिलीय प्राधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.रा.आ.अनभोरे यांनी त्याबाबतचा तपशील प्रपत्रात नमूद केला. तसेच कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांना त्वरित देण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले व त्यानुसार त्याच दिवशी माहिती दिली. तथापि ती अपूर्ण असल्याचे श्री.भोसले यांनी नमूद केले. आपल्याला अद्याप पूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.भोसले यांनी दि.२७.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि श्री.भोसले यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती त्यांना समक्ष देण्यात आली आहे व त्यांच्या अर्जाला मुद्देनिहाय उत्तर देण्यात आले आहे. माहितीपेक्षा संबंधित शिधापत्रिकेबाबत कार्यवाही होणे त्यांना अपेक्षित असल्याचे त्यांच्या मूळ अर्जावरून स्पष्ट होते. अशी कार्यवाही ही प्रशासकीय बाब असल्याने त्यांनी विहित पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे, असा अहवाल परिमंडल अधिकारी

'ड ' विभाग, पुणे श्रीमती आशा शंकर होळकर यांनी दि.१५.१२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास सादर केला. तथापि श्री.भोसले यांनी मूळ अर्जात मागितलेली कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे त्यांच्या उत्तरात मुद्दा क्र.२ व ३ मध्ये म्हटले आहे. जतनाच्या कालावधीनुसार या माहितीच्या उपलब्धतेबाबतचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, परिमंडल कार्यालय 'ड ' विभाग, पुणे श्रीमती आशा शंकर होळकर यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) जतनाच्या कालावधीनुसार मुद्दा क्र.२ व ३ मधील कागदपत्रांबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी, परिमंडल कार्यालय 'ड ' विभाग, पुणे यांनी आयोगाला दि.१५.१.२०१० पर्यंत सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

पुणे
दि.२८.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासम माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१) श्रीमती पुष्पा कापसे **अपीलकर्ता**
२) श्री. शिवाजी आनंदा कापसे
घर नं. २६४६, डी वॉर्ड, जूना बुधवार पेठ,
डांगे गल्ली पाठीमागची बाजू, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** **उत्तरवादी**
शिक्षण उपसंचालक,
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा**
सहायक शिक्षण संचालक,
शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१९४२/२००९/कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२-६-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८-७-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७-८-२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-९-२००९ |

३ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

कोल्हापूर येथील अध्यापक विद्यालय (डी.एड. कॉलेज) शी संबंधित (विद्यालय संख्या, विद्यार्थी संख्या, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची संख्या, वेतनश्रेणी, नियुक्ती दिनांक, संबंधित शासन निर्णय, सुट्ट्या तदनुषंगिक एकूण १३ मुद्दे)

## विवेचन

अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग यांनी दिनांक २५.९.२००९ रोजी अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती दिलेली असून या व्यतिरिक्त त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे कार्यालयात येऊन अवलोकन करावे व त्यांना त्यावेळी आवश्यक ती माहिती नियमानुसार देण्यात येईल या प्रमाणे दिलेला निर्णय कायम करण्यात येत आहे. अपीलकर्त्या श्रीमती पुष्पा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन अपीलकर्ता क्र. २ श्री. शिवाजी आनंदा कापसे हे मूळ अर्जदार नसल्याने त्यांच्या नावाचा समावेश आयोगाकडील अपीलात करणे अयोग्य असल्याच. समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहेत.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २८.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. अभयसिंह राजाराम देशमुख
१०६८/१०, गावभाग,
एस.टी. स्टॅन्ड समोर, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली
जिल्हा सांगली

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५१/२००९/ सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.११.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अभयसिंग राजाराम देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. यास्तव त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०-१२-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. अभयसिंह राजाराम देशमुख
१०६८/१०, गावभाग,
एस.टी. स्टॅन्ड समोर, सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय,
सांगली

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९५२/२००९/ सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.११.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अभयसिंग राजाराम देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. श्री देशमुख यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०-१२-२००९